आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२२ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- १६ व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या निमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या रशिया दौऱ्यावर

- राष्ट्रीय जल पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान

- डिजिटल सुविधांमधल्या गुंतवणुकीमुळे भारतीय अर्थव्यवस्था आणखी मजबूत झाल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची अधिसूचना जारी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून प्रारंभ

**आणि**

- ‘दाना’ चक्रीवादळ येत्या गुरुवार आणि शुक्रवार दरम्यानच्या मध्यरात्री ओदिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर धडकेल, असा हवामान विभागाचा अंदाज.

**<><><><><>**

१६व्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या रशिया दौऱ्यावर रवाना झाले असून ते थोड्या वेळापूर्वी कझानला पोहोचले. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच देशांच्या ब्रिक्स समूहाची ही शिखर परिषद आजपासून कझान इथं सुरू होत आहे. ब्रिक्स समूहातलं परस्पर सहकार्य भारताच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाचं असून जागतिक महत्त्वाच्या विविध मुद्यांवर या परिषदेत चर्चा होईल, असं प्रधानमंत्र्यांनी दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या परिषदेच्या

निमित्तानं भारत – रशिया द्विपक्षीय संबंधानाही चालना मिळेल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

ब्रिक्स समूहानं सुरू केलेल्या उपक्रमांमधील प्रगतीचाही या परिषदेत आढावा घेतला जाणार आहे. उद्या या परिषदेचा मुख्य दिवस आहे. गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्ग इथं या समुहाचा विस्तार करण्यात आला होता. त्यानंतर प्रथमच ही शिखर परिषद होत आहे. या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यासमवेत द्विपक्षीय बैठक घेणार आहेत. तसंच परिषदेच्या निमित्तानं आलेल्या इतर देशांच्या प्रमुखांशीही ते  द्विपक्षीय चर्चा करण्याची अपेक्षा असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या अधिकाऱ्यानं सांगितलं.

<><><><><>

सरकारनं सुरू केलेल्या जलजीवन मिशनमुळे ग्रामीण भागात राहणाऱ्यांच्या जीवनात लक्षणीय सुधारणा झाल्याची माहिती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज दिली. जलशक्ती मंत्रालयातर्फे दिल्या जाणाऱ्या पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी त्या बोलत होत्या. या पुरस्कारांसाठी सर्वोत्कृष्ट राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, शहरी स्थानिक संस्था, शाळा किंवा महाविद्यालय, उद्योग, सर्वोत्कृष्ट पाणी वापरकर्ती संघटना, संस्था आणि नागरी संस्था अशा ९ श्रेणींमध्ये ३८ विजेते निवडण्यात आले. सर्वोत्कृष्ट राज्याच्या गटात ओडिशानं पहिला, उत्तर प्रदेशने दुसरा तर गुजरात आणि पुद्दुचेरीने संयुक्तपणे तिसरा क्रमांक पटकावला. महाराष्ट्रालाही पाच जलपुरस्कार मिळाले आहेत. यात सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्था या श्रेणीत पुणे महानगर पालिकेला पुरस्कार मिळाला आहे. विविध श्रेणीत मिळून महाराष्ट्राला ५ पुरस्कार मिळाले.

<><><><><>

डिजिटल सुविधांमधल्या गुंतवणुकीमुळे भारतीय अर्थव्यवस्था आणखी मजबूत झाल्याचं न केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. अमेरिकतल्या कोलंबिया विद्यापीठात त्या बोलत होत्या. भांडवलाच्या उपलब्धतेमुळे भारतीय बँकिंग व्यवस्था बळकट राहिल्याचंही त्या म्हणाल्या. महत्त्वाच्या उद्योगांमधली गुंतवणूक वाढवण्यासाठी आवश्यक भांडवल पुरवठा करणं हाच भारताच्या आर्थिक विकासाचा महत्त्वाचा घटक असल्याचंही त्यांनी अधोरेखित केलं. सध्या भारत ही जगातली पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून जागतिक विकासात भारताचं योगदान पुढच्या पाच वर्षांत आणखी वाढेल, असा विश्वासही सीतारामन यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><><><>

उत्पादनांचा वापर आणि गुंतवणुकीची मागणी वाढत असल्यामुळे भारताची विकास वाटचाल अबाधित असल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी रिझर्व बँकेच्या मासिक अहवालात म्हटलं आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताचा वास्तविक स्थूल उत्पादन वाढीचा दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा अंदाज असल्याचं, यात म्हटलं आहे. कृषी क्षेत्राबाबतचा सुधारित दृष्टिकोन आणि ग्रामीण भागातली वाढती मागणी, या पार्श्वभूमीवर उत्पादनांच्या खासगी वापरला चालना मिळणार असून, सेवांमधली सातत्यपूर्ण वाढ शहरी भागातल्या मागणीला पूरक ठरणार असल्याचं यात म्हटलं आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ग्राहक मूल्य निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर साडेचार टक्के राहील, असा अंदाज या अहवालात वर्तवण्यात आला आहे.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्रालयानं आणखी पाच राष्ट्रीय बँकांना मुख्य महाव्यवस्थापक हे पद निर्माण करायला मंजुरी दिली आहे. यामध्ये महाराष्ट्र बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, पंजाब आणि सिंध बँक तसंच युको बँकेचा समावेश आहे. ज्या बँकामध्ये सीजीएम हे पद अगोदरच अस्तित्वात आहे, तिथे या पदांची संख्या वाढवण्यासही मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळं ११ राष्ट्रीयकृत बँकांमधील सीजीएम पदांची एकूण संख्या आता ८० वरून १४४ होणार आहे. ही पदसंख्येची फेररचना बँकांच्या चार सरव्यवस्थापकांमागे एक सीजीएम या गुणोत्तरावर आधारित असल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात एकाच टप्प्यात होत असलेल्या विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज प्रसिद्ध झाली असून राज्यातल्या सर्व २८८ मतदारसंघांमधे एकाच टप्प्यात येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज आजपासून भरता येतील. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. या अर्जांची छाननी ३० ऑक्टोबरला होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. २०नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

**नांदेड** लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीची अधिसूचनाही जारी झाली आहे. काँग्रेस खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली आहे. पोटनिवडणुकीसाठीचं मतदानही २० नोव्हेंबरला होणार असून मतमोजणी २३ नोव्हेंबरला होईल.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी २७ स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.

या यादीत उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनिल तटकरे, मंत्री छगन भुजबळ, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, खासदार नितीन पाटील, सयाजी शिंदे, आमदार अमोल मिटकरी यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात ३८ जागांसाठी मतदान होणार आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आहे. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल आणि १ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील. २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात निर्माण होत असलेलं 'दाना' चक्रीवादळ ओदिशा किनारपट्टीच्या दिशेनं पुढे सरकत आहे. हे वादळ येत्या गुरुवार आणि शुक्रवार दरम्यानच्या मध्यरात्री ओदिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर तीव्र चक्रीवादळाच्या स्वरूपात धडकेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

ओदिशा किनारपट्टीवरच्या भितरकणिका आणि धामरा दरम्यान हे वादळ धडक देईल, असा अंदाज हवामानाच्या अनेक मॉडेल्सनं वर्तवला आहे. त्यामुळे या भागातल्या सर्व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचं काम युद्धपातळीवर सुरु आहे.

वादळाच्या प्रभावामुळे उद्यापासून या भागात पाऊस जोर पकडणार असून, हवामान विभागानं मयूरभंज, कटक, जाजपूर, बालासोर, भद्रक, केंद्रपारा, खोरधा, केओंझार, पुरी आणि जगतसिंगपूर या भागाला येत्या गुरुवारी पावसाचा आणि पुराचा रेड अलर्ट जारी केला आहे. ओदिशाच्या किनारपट्टी भागात एनडीआरएफ नं आपत्कालीन प्रतिसादासाठी आपल्या ११ तुकड्या तैनात केल्या असून, भारतीय लष्कर, नौदल आणि तटरक्षक दल देखील बचाव कार्यासाठी सज्ज आहे.

चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर ओदिशा सरकारनं किनारपट्टी भागातल्या आणि लगतच्या १४जिल्ह्यांमधल्या सर्व शाळा उद्यापासून तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा ओदिशा राज्याचा तीन दिवसांचा पूर्वनियोजित दौरा पुढे ढकलण्यात आला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत देशाच्या **पूर्व आणि दक्षिण** द्वीपकल्प भागात जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**